# कार्यालय जिल्हा शल्यचिकित्सक

जिल्हा रुग्णालय चिकलठाणा, जालना रोड, विमानतळ समोर, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००७

Email. I.D. - csaurangabad.store2@gmail.com


04 APR 2025

जा. जिशचि/छसंन/औ भा/२०२५-२६/ 5970-71 दिनांक :- 03/०४/२०२५

## दरपत्रक सादर करण्याबाबत - जाहीर प्रकटन

विनावापर असलेल्या खालील बाबीच्या विक्री करिता पात्रता धारक तथा इच्छुकाकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. दरपत्रक सादर करणाऱ्यांनी दरपत्रकाच्या अटी व शर्ती वाचून समजून घ्याव्या.

दरपत्रक सादर करण्याचा कालावधी दिनांक ०४/०४/२०२५ ते दिनांक ११/०४/२०२५ (दुपारी १.०० वाजे पर्यंत)

सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते अंतिम दिनांक व वेळेच्या आत दरपत्रक सादर करणे बंधनकारक आहे. पोस्टाने अथवा कुरियर द्वारे झालेल्या विलंबाची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

| क्र | विक्री करावयाच्या बाबींचा तपशील | नग |
|---|---|---|
| १ | विनावापर असलेला - पुठ्ठा | प्रती किलोग्राम |
| २ | विनावापर असलेला - थर्माकोल बॉक्स मध्यम | प्रती बॉक्स |
| ३ | विनावापर असलेला - थर्माकोल बॉक्स छोटा | प्रती बॉक्स |

**अ) दरपत्रकाच्या लिफाफा क्र १ मध्ये खालील अभिलेख सादर करणे आवश्यक आहे -**
**(या लिफाफ्यावर "तांत्रिक लिफाफा" असे नमूद करावे)**

१) दुकाने व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र

२) आधार कार्ड

३) पॅन कार्ड

४) जी एस टी नोंदणी प्रमाणपत्र

५) दरपत्रक सादर करणाऱ्याचे हित संबंध बाबतचे हमीपत्र (सोबत नमुना दिला आहे)

६) लेटर हेडवर वचनपत्र - दरपत्रकाच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे वचनपत्र

**ब) दरपत्रकाच्या लिफाफा क्र २ मध्ये -फक्त लेटर हेडवर - विहित नमुन्यात दरपत्रक (सोबत नमुना दिला आहे) सादर करणे आवश्यक आहे. (या लिफाफ्यावर "दरपत्रकाचा लिफाफा" असे नमूद करावे)**

**क) दरपत्रक सादर करण्याची पद्धत -**

लिफाफा क्र १ - तांत्रिक कागदपत्रांचा लिफाफा आणि लिफाफा क्र २ - दरपत्रकाचा लिफाफा हे दोन्ही सील बंद लिफाफे एका मोठ्या लिफाफ्यात टाकून यावर **"विनावापर पुठ्ठा, थर्माकोल बॉक्स खरेदी करिता दरपत्रक"** असे नमूद करून सील बंद करून या कार्यालयास सादर करावे.

**ड) दरपत्रकाच्या अटी व शर्ती :-**

१) लिफाफा क्र १ मध्ये आवश्यक कागदपत्रकाची पूर्तता न करणाऱ्याचा लिफाफा क्र २ उघडण्यात येणार नाही.

२) उच्चतम दर सादर करणाऱ्यास प्रस्तुत काम सन २०२५-२६ करिता सदरील कामाचे कंत्राट दिले जाईल. सदरील दर दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंत वैध राहील.

३) बाजार भावात दरात चढ उतार झाल्यास नमूद केलेल्या दर मध्ये कार्यालया कडून बदल केला जाणार नाही.

४) पुठ्ठा, थर्माकोल बॉक्स वाहतूक करण्यासाठी येणारा खर्च हा दरपत्रक धारकास करावा लागेल.

५) जिल्हा रुग्णालयाच्या औषधी भांडार तसेच अन्य भांडार, रुग्ण कक्ष, विविध विभागा मध्ये रिकामे झालेले तसेच विनावापर असलेला पुठ्ठा, थर्माकोल बॉक्स इत्यादी बाबी जमा करण्यासाठी दरपत्रक धारकास त्यांचा प्रतिनिधी अथवा कामगार नेमणूक करावा लागेल, यासाठी येणारा खर्च या कार्यालयाकडून दिला जाणार नाही. सदर कामगार हा बालकामगार असता कामा नये.

६) पुठ्ठा, थर्माकोल बॉक्स घेवून जाण्यापूर्वी त्याची मोजणी करून देय होणारे शुल्काची रक्कम कार्यालयात जमा करून त्याची पावती दाखवून घेवून जाता येईल.

७) रुग्णालयाच्या विविध कक्षाच्या प्रमुखाच्या परवानगी शिवाय पुठ्ठा, थर्माकोल बॉक्स घेवून जाण्यासाठी हुज्जत, वादविवाद करू नये हि बाब गैरवर्तन म्हणून गणली जाईल व याची उचीत दखल घेवून, दिलेले कंत्राट पूर्व परवानगी शिवाय रद्द केले जाईल.

८) जिल्हा रुग्णालयाच्या विविध विभागामधून कंत्राट व्यतिरिक्त (पुठ्ठा, थर्माकोल बॉक्स शिवाय) अन्य कोणतीही वस्तू विना परवानगी घेवून जाताना निदर्शनास आल्यास ही बाब चोरी केल्याचे गणले जावून याबाबत पोलिसात गुन्हा दाखल केला जाईल व दिलेले कंत्राट पूर्व परवानगी शिवाय रद्द केले जाईल.

९) कोणतेही कारण न देता कुणाचेही दरपत्रक न स्वीकारणे अथवा सर्व दरपत्रके बाद करणे, अथवा सदरील दरपत्रक रद्द करण्याबाबतचे अथवा अन्य अटी शर्ती यामध्ये कधीही काहीही फेरबदल करण्याचे सर्व अधिकार निम्न स्वाक्षरीतानी राखून ठेवले आहे.

(डॉ दयानंद मोतीपवळे)
जिल्हा शल्यचिकित्सक
जिल्हा रुग्णालय छत्रपती संभाजीनगर

प्रत :- प्रस्तुत कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिद्धी साठी

प्रत :- आय. टी. कक्ष - कार्यालय मा. आयुक्त, आरोग्य सेवा मुंबई सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी साठी.

*लेटर हेडवर - दरपत्रक सादर करण्याचा नमुना*

दिनांक / /२०२५

प्रति,

मा. जिल्हा शल्यचिकित्सक,

जिल्हा रुग्णालय छत्रपती संभाजीनगर

विषय :- रिकामे झालेले तसेच विनावापर असलेला पुठ्ठा, थर्माकोल बॉक्स खरेदी करण्यासाठी दरपत्रक सादर करणे बाबत ..

संदर्भ :- आपल्या कार्यालयाची दरपत्रक सादर करण्या बाबतचे जाहीर प्रकटन दिनांक / /२०२५

महोदय,

वरील विषयी संदर्भीय जाहीर प्रकटन नुसार मी दरपत्रक सादर करत आहे. माझे दर मे खालील प्रमाणे सादर करत आहे.

| क्र | तपशील | दर | रुपये |
|---|---|---|---|
| १ | रिकामे झालेले तसेच विनावापर असलेला पुठ्ठा | प्रती किलोग्राम | |
| २ | रिकामे झालेले तसेच विनावापर असलेला - **थर्माकोल बॉक्स मध्यम** | प्रती बॉक्स | |
| ३ | रिकामे झालेले तसेच विनावापर असलेला - **थर्माकोल बॉक्स छोटा** | प्रती बॉक्स | |

सादर केलेला दर हा सर्व करासह असून आपल्या रुग्णालयाच्या आवारातून स्वतःच्या वाहनात घेवून जाण्याचा आहे. माझे दर उच्चतम आढळून आल्यास मी दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करील याचे मे वाचन देत आहे. तसेच दरपत्रक मान्य करण्यासाठी कोणताही दबाव आणणार नाही, असे आढळून आल्यास माझे दरपत्रक रद्द करावे. हि विनंती.

स्थळ :-

दिनांक :-

अधिकृताची स्वाक्षरी

(नाव ..................................)

दरपत्रक धारकाचे नाव व शिक्का

## *लेटर हेडवर - हमीपत्र सादर करण्याचा नमुना*

## दरपत्रक सादर करणाऱ्याचे हमीपत्र

महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग

शासननिर्णयक्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग।।।/उद्योग-४,दि.१डिसेंबर २०१६.

नियम क्र.४:२:५ नुसार.

मी/आम्ही.....................................................................................................

या हमीपत्राव्दारे लिहुन देतो की, दरपत्रक मागविणाऱ्या खरेदी प्राधिकाऱ्या बरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंध नसुन हितसंबंधा बाबत संघर्ष नाही. तसेच खरेदी प्राधिकाऱ्याकडे सादर करण्यात आलेले दरपत्रक हे एकल असुन दुसऱ्या कोणत्याही संस्थेसोबत संयुक्तरित्या किंवा संगनमताने साखळी करुन भरलेले नाही. असे आढळुन आल्यास नियमानुसार योग्य त्या दंडात्मक कार्यवाहीसाठी मी पात्र राहील.

दरपत्रक सादर करणाऱ्याची स्वाक्षरी
**Sign & Stamp Of Bidder**

दिनांक :-
स्थळ :-